भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

# तस्कर आणि विदेशी विनिमय चलन कूटव्यवहारी (संपत्तीचे समपहरण) अधिनियम, १९७६

**( १९७६ चा अधिनियम क्रमांक १३ )**

[३१ जुलै १९९७ रोजी यथाविद्यमान]

# THE SMUGGLERS AND FOREIGN EXCHANGE MANIPULATORS ( FORFEITURE OF PROPERTY ) ACT, 1976

**( Act No. 13 of 1976 )**

[ *As in force on the 31st July 1997* ]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन
यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

[ **किंमत :** रुपये ६.०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ जुलै १९९७ रोजी यथाविद्यमान असलेला दि स्मगलर्स ॲन्ड फॉरिन एक्सचेंज मॅनिप्युलेटर्स (फॉरफिचर ऑफ प्रॉपर्टी) ॲक्ट, १९७६ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ८, अंक २, दिनांक २२ डिसेंबर, १९९७ यात पृष्ठ ७२ ते ८१ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,<br>
दिनांक : २२ डिसेंबर १९९७.

**के. एल. मोहनपुरिया,**<br>
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the Smugglers and Foreign Exchange Manipulators (Forfeiture of Property) Act, 1976 as on the 31st July 1997 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India,* Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 8 dated 22nd December 1997 on pages 72 to 81.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

NEW DELHI,<br>
Date : 22nd December 1997.

K. L. MOHANPURIYA,<br>
Secretary to the Government of India.

# तस्कर आणि विदेशी विनिमय चलन कूटव्यवहारी (संपत्तीचे समपहरण) अधिनियम, १९७६

## कलमांचा क्रम

कलमे


१ संक्षिप्त नाव, विस्तार आणि प्रारंभ.

२. प्रयुक्ती.

३. व्याख्या.

४. अवैधपणे संपादन केलेली संपत्ती धारण करण्यास मनाई.

५. सक्षम प्राधिकरण.

६. समपहरणाची नोटीस.

७. विवक्षित प्रकरणी संपत्तीचे समपहरण.

८. शाबितीचा भार.

९ समपहरणाच्या ऐवजी द्रव्यदंड.

१०. विशिष्ट न्यास संपत्तीच्या संबंधातील कार्यपद्धती.

११. विवक्षित हस्तांतरणे रद्दबातल असणे.

१२. अपील न्यायाधिकरण घटित करणे.

१३. नोटीस किंवा आदेश त्यातील वर्णनात कोणतीही चूक असल्यामुळे विधिबाह्य न होणे.

१४. अधिकारितेला आडकाठी.

१५. सक्षम प्राधिकरण आणि अपील न्यायाधिकरण यांना दिवाणी न्यायालयाच्या शक्ती असणे.

१६. सक्षम प्राधिकरणाला माहिती देणे.

१७. विवक्षित अधिकाऱ्यांनी सक्षम प्राधिकरणाला आणि अपील न्यायाधिकरणाला सहाय्य करणे.

१८. विवक्षित अधिकाऱ्यांना विशिष्ट शक्तींचा वापर करण्यास फर्मावण्याची सक्षम प्राधिकरणाची शक्ती.

१९. कब्जा घेण्याची शक्ती.

२०. चुकांची दुरुस्ती.

२१. अन्य कायद्यांन्वये काढलेले निष्कर्ष या अधिनियमाखालील कार्यवाहीच्या प्रयोजनार्थ निर्णायक नसणे.

२२. नोटिसा आणि आदेश बजावणे.

२३. सद्‌भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

२४. या अधिनियमाला अधिभावी परिणाम असणे.

२५. या अधिनियमाचे उपबंध न्यास म्हणून धारण केलेल्या विवक्षित संपत्तीला लागू नसणे.

२६. नियम करण्याची शक्ती.

२७. निरसन आणि व्यावृत्ती.

# तस्कर आणि विदेशी विनिमय चलन कूटव्यवहारी (संपत्तीचे समपहरण) अधिनियम, १९७६

**(१९७६ चा अधिनियम १३)**

(३१ जुलै, १९९७ रोजी यथाविद्यमान)

**[२५ जानेवारी १९७६]**

**तस्कर आणि विदेशी विनिमय चलन कूटव्यवहारी यांना बेकायदेशीररित्या संपादन केलेल्या संपत्तीचे समपहरण करण्याचा आणि त्याच्याशी निगडीत किंवा आनुषंगिक असलेल्या बाबींचा उपबंध करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर विघातक परिणाम करणारे तस्करीचे क्रियाव्यापार व विदेशी विनिमय चलनाबाबतचे कूटव्यवहार यांना परिणामकारकरित्या प्रतिबंध करण्यासाठी असे क्रियाव्यापार आणि कूटव्यवहार यांत गुंतलेल्या व्यक्तींना, त्यांना वाममार्गाने झालेल्या कमाईपासून वंचित करणे आवश्यक आहे ;

**आणि ज्याअर्थी,** अशा व्यक्ती धन कर, आय कर यांविषयीच्या किंवा इतर कायद्यांचे उल्लंघन करून, किंवा अन्य साधनांद्वारा अशी कमाई वाढवीत आहेत आणि त्याद्वारे चोरटेपणाने व्यवहार करण्यासाठी आपल्या साधनसंपत्तीत वाढ करीत आहेत ;

**आणि ज्याअर्थी,** अशा व्यक्ती बऱ्याच वेळा अशा कमाईतून त्यांनी मिळवलेली संपत्ती आपले नातेवाईक, सहयोगी आणि विश्वासातील व्यक्ती यांच्या नावे धारण करीत असतात ;

**त्याअर्थी,** संसदेकडून भारतीय गणराज्याच्या सव्विसाव्या वर्षी पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, विस्तार आणि प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास 'तस्कर आणि विदेशी विनिमय चलन कूटव्यवहारी (संपत्तीचे समपहरण) अधिनियम, १९७६' असे म्हणता येईल.

(२) या अधिनियमाचा विस्तार जम्मू आणि काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे.

(३) हा अधिनियम ५ नोव्हेंबर १९७५ रोजी अंमलात आला असे मानण्यात येईल.

प्रयुक्ती.

**२.** (१) या अधिनियमाचे उपबंध पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तींनाच फक्त लागू असतील.

(२) पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेल्या व्यक्ती पुढीलप्रमाणे आहेत, त्या म्हणजे :—

(क) जी व्यक्ती,—

(एक) सागरी सीमाशुल्क अधिनियम, १८७८ (१८७८ चा ८) किंवा सीमाशुल्क अधिनियम, १९६२ (१९६२ चा ५२) याअन्वये एक लाख रुपयांहून अधिक मूल्य असलेल्या मालाच्या संबंधातील अपराधाबद्दल दोषी ठरविली गेली आहे ; किंवा

(दोन) विदेशी विनिमय चलन विनियमन अधिनियम, १९४७ (१९४७ चा ७) किंवा विदेशी विनिमय चलन विनियमन अधिनियम, १९७३ (१९७३ चा ४६) याअन्वये ज्यात एक लाख रुपयांहून अधिक रक्कम किंवा तेवढे मूल्य गुंतले आहे अशा अपराधाबद्दल दोषी ठरविली गेली आहे ; किंवा

(तीन) सागरी सीमाशुल्क अधिनियम, १८७८ (१८७८ चा ८) किंवा सीमाशुल्क अधिनियम, १९६२ (१९६२ चा ५२) या अन्वये दोषी ठरलेली असून, त्यानंतर या दोन अधिनियमांपैकी कोणत्याही एका अधिनियमान्वये दोषी ठरविण्यात आली आहे ; किंवा

(चार) विदेशी विनिमय चलन विनियमन अधिनियम, १९४७ (१९४७ चा ७) किंवा विदेशी विनिमय चलन विनियमन अधिनियम, १९७३ (१९७३ चा ४६) याअन्वये दोषी ठरलेली असून, त्यानंतर या दोन अधिनियमांपैकी कोणत्याही एका अधिनियमान्वये दोषी ठरविण्यात आली आहे ;

अशी प्रत्येक व्यक्ती ;

(ख) विदेशी विनिमय चलनाचे जतन व तस्करीच्या क्रियाव्यापारांस प्रतिबंध अधिनियम, १९७४ (१९७४ चा ५२) याअन्वये जिच्यासंबंधात स्थानबद्धता आदेश काढण्यात आला आहे, अशी प्रत्येक व्यक्ती :

परंतु,—

(एक) असा स्थानबद्धता आदेश हा, ज्याला उक्त अधिनियमाचे कलम ९ किंवा कलम १२क यांचे उपबंध लागू होत नाहीत असा असल्यास, तो उक्त अधिनियमाच्या कलम ८ अन्वये सल्लागार मंडळाच्या अहवालावरून किंवा सल्लागार मंडळाचा अहवाल मिळण्यापूर्वी किंवा सल्लागार मंडळाकडे निर्देश करण्यात येण्यापूर्वी रद्द करण्यात आलेला असता कामा नये ; किंवा

(दोन) असा स्थानबद्धता आदेश हा, ज्याला उक्त अधिनियमाच्या कलम ९ चे उपबंध लागू होतात असा असल्यास, तो उक्त अधिनियमाचे कलम ९ पोट-कलम (३) खालील पुनर्विलोकनासाठी दिलेली मुदत संपण्यापूर्वी किंवा त्या पुनर्विलोकनाच्या आधारे किंवा त्या अधिनियमाचे कलम ९, पोट-कलम (२) सहित कलम ८ अन्वये सल्लागार मंडळाने दिलेल्या अहवालावरून रद्द केलेला असता कामा नये ; किंवा

(तीन) असा स्थानबद्धता आदेश हा, ज्याला उक्त अधिनियमाच्या कलम १२क चे उपबंध लागू होतात असा असल्यास, तो उक्त कलमाच्या पोट-कलम (३) खालील पहिल्या पुनर्विलोकनाची मुदत संपण्यापूर्वी किंवा त्या पुनर्विलोकनाच्या आधारे किंवा उक्त अधिनियमाचे कलम १२क, पोट-कलम (६) सहित कलम ८ अन्वये सल्लागार मंडळाने सादर केलेल्या अहवालावरून रद्द करण्यात आलेला असता कामा नये ; किंवा

(चार) असा स्थानबद्धता आदेश सक्षम अधिकारिता असलेल्या न्यायालयाने रद्द ठरवलेला असता कामा नये ;

(ग्) खंड (क्) किंवा खंड (ख्) मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीची नातेवाईक असलेली प्रत्येक व्यक्ती ;

(घ्) खंड (क्) किंवा खंड (ख्) मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीचा प्रत्येक सहयोगी ;

(ङ्) खंड (क्) किंवा खंड (ख्) मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीने जी पूर्वी कोणत्याही वेळी धारण केली होती अशा कोणत्याही संपत्तीचा कोणताही धारक (यापुढे तो या खंडात ' विद्यमान धारक ' म्हणून संबोधण्यात आला आहे) ; मात्र, विद्यमान धारक किंवा, प्रकरणपरत्वे, ज्याने अशा व्यक्तीनंतर व विद्यमान धारकापूर्वी अशी संपत्ती धारण केली होती, असा कोणीही समुचित प्रतिफलाच्या मोबदल्यात सद्भावपूर्वक हस्तांतरिती झाला आहे किंवा होता असे असेल तर गोष्ट अलाहिदा.

**स्पष्टीकरण १.**—खंड (क्) च्या उपखंड (एक) च्या प्रयोजनार्थ ज्याच्या संबंधात एखादी व्यक्ती एखाद्या अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आली आहे अशा कोणत्याही मालाचे मूल्य हे, तो अपराध घडण्याच्या दिनांकाला भारतातील व्यापाराच्या सर्वसामान्य ओघात त्या मालाची जी घाऊक किंमत असेल तितके असेल.

**स्पष्टीकरण २.**—खंड (ग्) च्या प्रयोजनार्थ, एखाद्या व्यक्तीचा " नातेवाईक " याचा अर्थ, पुढीलप्रमाणे आहे :—

(एक) त्या व्यक्तीचा विवाहसाथी ;

(दोन) त्या व्यक्तीचा भाऊ किंवा बहीण ;

(तीन) त्या व्यक्तीच्या विवाहसाथीचा भाऊ किंवा बहीण ;

(चार) त्या व्यक्तीचा कोणताही रेषीय पूर्वज किंवा वंशज ;

(पाच) त्या व्यक्तीच्या विवाहसाथीचा कोणताही रेषीय पूर्वज किंवा वंशज ;

(सहा) खंड (दोन), खंड (तीन), खंड (चार) किंवा खंड (पाच) मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीचा विवाहसाथी ;

(सात) खंड (दोन) किंवा खंड (तीन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीचा कोणताही रेषीय वंशज.

**स्पष्टीकरण ३.**—खंड (घ्) च्या प्रयोजनार्थ, एखाद्या व्यक्तीचा " सहयोगी " याचा अर्थ, पुढीलप्रमाणे आहे :—

(एक) अशा व्यक्तीच्या निवासी वास्तुमध्ये (उपगृह धरून) जो रहात होता किंवा जो रहात असेल असा कोणताही माणूस ;

(दोन) अशा व्यक्तीच्या कामकाजाची जो व्यवस्था पहात होता किंवा पहात आहे असा किंवा जो तिचे हिशेब ठेवत होता किंवा ठेवत आहे असा कोणताही माणूस ;

(तीन) अशी व्यक्ती ज्यांचा सदस्य, भागीदार किंवा संचालक होती किंवा आहे असा कोणताही व्यक्तिसंघ, असा माणसांचा निकाय, अशी भागीदारी फर्म किंवा कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) याच्या अर्थानुसार असलेली अशी, खाजगी कंपनी ;

(चार) अशी व्यक्ती ज्यावेळी एखादा व्यक्तिसंघ, माणसांचा निकाय, भागीदारी फर्म, किंवा कंपनी अधिनियमाच्या अर्थानुसार असलेली खाजगी कंपनी यांचा सदस्य, भागीदार किंवा संचालक होती किंवा आहे त्यावेळी जो कोणताही माणूस त्या संघाचा, निकायाचा, भागीदारी फर्मचा किंवा त्या खाजगी कंपनीचा सदस्य, भागीदार किंवा संचालक होता किंवा असेल तो कोणताही माणूस ;

(पाच) खंड (तीन) मध्ये निर्दिष्ट केलेला कोणताही व्यक्तिसंघ, माणसांचा निकाय, भागीदारी फर्म किंवा खाजगी कंपनी यांच्या कामकाजाची व्यवस्था पाहण्याचे किंवा त्यांचे हिशोब ठेवण्याचे काम जो करीत होता किंवा करीत आहे, असा कोणताही माणूस ;

(सहा) कोणत्याही न्यासाचा विश्वस्त ; मात्र,—

(क्) तो न्यास अशा व्यक्तिकडून निर्माण करण्यात आलेला असावा ; किंवा

(ख्) अशा व्यक्तिने रकमांमध्ये अंशदान केलेल्या मत्तांचे मूल्य हे (तिने पूर्वी काही मत्तांचे अंशदान केले असल्यास, त्या मत्तांचे मूल्य धरून) तिने असे अंशदान ज्या दिनांकाला केले होते त्या दिनांकाला, न्यासाच्या मालकीच्या त्या दिनांकास असलेल्या मत्तांच्या मूल्याच्या वीस टक्क्यापेक्षा कमी नसावे ;

(सात) सक्षम प्राधिकरणाला जर काही कारणांस्तव—ती कारणे लेखी नमूद करण्यात येतील असे वाटले की, अशा व्यक्तिची कोणतीही मत्ता तिच्यावतीने अन्य कोणत्याही व्यक्तिने धारण केली आहे तर, अशी अन्य व्यक्ती.

**स्पष्टीकरण ४.**—शंकानिरसन करण्याच्या दृष्टीने याद्वारे असे उपबंधित करण्यात येत आहे की, एखादी व्यक्ती ही, जिला या अधिनियमाचे उपबंध लागू होतात अशी व्यक्ती आहे किंवा कसे यासंबंधीच्या प्रश्नाचा निर्णय, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी निर्माण झालेल्या किंवा घडलेल्या वस्तुस्थितीच्या किंवा परिस्थितीच्या किंवा घटनांच्या (कोणतीही दोषसिद्धी किंवा कोणतीही स्थानबद्धता धरून) संदर्भात करण्यात येईल.

**३.** (१) या अधिनियमात संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क्) " अपील न्यायाधिकरण " याचा अर्थ, कलम १२ अन्वये घटित केलेले समपहृत संपत्ती अपील न्यायाधिकरण, असा आहे ;

(ख्) " सक्षम प्राधिकरण " याचा अर्थ, या अधिनियमाखालील सक्षम प्राधिकरणाची कार्ये पार पाडण्यासाठी कलम ५, पोट-कलम (१) अन्वये केंद्र शासनाने प्राधिकृत केलेला त्याचा अधिकारी, असा आहे ;

(ग्) ज्या कोणत्याही व्यक्तिला हा अधिनियम लागू होतो, त्या व्यक्तिच्या संबंधात " अवैधपणे संपादन केलेली संपत्ती " याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे,—

(एक) जिच्यासंबंधात कायदा करण्याची संसदेला शक्ती आहे अशा कोणत्याही बाबीच्या संबंधात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याखाली मनाई करण्यात आलेल्या कोणत्याही क्रियाव्यापारातून उपलब्ध झालेले किंवा मिळवलेले किंवा ज्यांचा त्या क्रियाव्यापाराशी संबंध जोडता येण्यासारखा आहे असे उत्पन्न, कमाई किंवा मत्ता यांमधून किंवा त्यांच्या साहाय्याने अशा व्यक्तिने पूर्णतः किंवा अंशतः संपादन केलेली कोणतीही संपत्ती–मग ती या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी संपादित केलेली असो किंवा नंतर संपादित केलेली असो ; किंवा

(दोन) ज्यांच्यासंबंधात अशा कोणत्याही कायद्याचे उल्लंघन करण्यात आले आहे असे कोणतेही उत्पन्न, अशी कमाई किंवा मत्ता यांमधून किंवा त्यांच्या साहाय्याने अशा व्यक्तिने पूर्णतः किंवा अंशतः संपादन केलेली कोणतीही संपत्ती–मग ती या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी संपादित केलेली असो किंवा नंतर संपादित केलेली असो ; किंवा

(तीन) ज्यांचा उगममार्ग सिद्ध करता येत नाही आणि जिच्यासंबंधात कायदा करण्याची संसदेला शक्ती नाही अशा कोणत्याही बाबीच्या संबंधात करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा गोष्ट यांच्याशी ज्याचा संबंध जोडता येण्यासारखा आहे असे दाखवता येत नाही असे

उत्पन्न, कमाई किंवा मत्ता यांमधून किंवा त्यांच्या साहाय्याने अशा व्यक्तिने पूर्णतः किंवा अंशतः संपादन केलेली कोणतीही संपत्ती–मग ती या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी संपादित केलेली असो किंवा नंतर संपादित केलेली असो ; किंवा

(चार) उपखंड (एक) ते (तीन) यांमध्ये निर्देशिलेली कोणतीही संपत्ती अथवा अशा संपत्तीतून मिळविलेले उत्पन्न किंवा कमाई यांच्याशी पूर्णतः किंवा अंशतः ज्याचा संबंध जोडता येण्यासारखा आहे अशा प्रतिफलाच्या मोबदल्यात किंवा अशा कोणत्याही मार्गाने अशा व्यक्तिने संपादन केलेली कोणतीही संपत्ती–मग ती या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी संपादित केलेली असो किंवा नंतर संपादित केलेली असो ;

—आणि या शब्दप्रयोगात पुढील प्रकारच्या संपत्तीचा समावेश होतो, ती अशी :—

(क) अशा व्यक्तिने धारण केलेली जी संपत्ती, तिच्या कोणत्याही आधीच्या धारकाने ती धारण करण्याचे बंद केले नसते तर, त्या आधीच्या धारकाच्या संबंधात ती या खंडान्वये अवैधपणे संपादन केलेली संपत्ती ठरली असती अशी कोणतीही संपत्ती; मात्र, अशी व्यक्ती किंवा अशा आधीच्या धारकानंतर ज्या कोणत्याही अन्य व्यक्तिने कोणत्याही वेळी ही संपत्ती धारण केली होती, ती कोणतीही अन्य व्यक्ती किंवा ज्या बाबतीत असे आधीचे धारक दोन किंवा त्याहून अधिक असतील त्या बाबतीत, अशा धारकांपैकी शेवटचा धारक समुचित प्रतिफलाच्या मोबदल्यात सद्‌भावपूर्वक हस्तांतरिती झाला आहे किंवा होता असे असेल तर गोष्ट अलाहिदा ;

(ख) बाब (क) मध्ये मोडणारी कोणतीही संपत्ती किंवा त्यातून मिळवलेले उत्पन्न किंवा कमाई यांच्याशी पूर्णतः किंवा अंशतः ज्याचा संबंध जोडता येण्यासारखा आहे अशा प्रतिफलाच्या मोबदल्यात किंवा अशा कोणत्याही मार्गाने अशा व्यक्तिने संपादन केलेली कोणतीही संपत्ती–मग ती या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी संपादित केलेली असो किंवा नंतर संपादित केलेली असो ;

(ग) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे ;

(घ) " संपत्ती " यामध्ये, जंगम किंवा स्थावर संपत्तीतील कोणत्याही हितसंबंधाचा समावेश होतो ;

(ङ) " न्यास " यामध्ये, अन्य कोणत्याही वैध आबंधनाचा समावेश होतो.

(२) या अधिनियमात ज्याचा निर्देश केलेला आहे, परंतु जो कोणत्याही क्षेत्रात अंमलात नाही अशा कोणत्याही कायद्याच्या निर्देशाचा त्या क्षेत्राच्या संबंधातील अर्थ, त्या क्षेत्रात कोणताही तत्सम कायदा अंमलात असल्यास, त्याचा निर्देश म्हणून लावला जाईल.

(३) या अधिनायमात, कोणताही अधिकारी किंवा प्राधिकरण याच्या संबंधीच्या निर्देशाचा जेथे तेच पदनाम असलेला कोणताही अधिकारी किंवा तसे प्रधिकरण नाही अशा कोणत्याही क्षेत्राच्या संबंधातील अर्थ, केंद्र शासनाकडून **शासकीय राजपत्रात** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकाऱ्याच्या किंवा प्राधिकरणाच्या संबंधीचा निर्देश म्हणून लावण्यात येईल.

अवैधपणे संपादन केलेली संपत्ती धारण करण्यास मनाई.

**४.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभी व तेव्हापासून, ज्या व्यक्तिला हा अधिनियम लागू होतो त्या व्यक्तिने, अवैधपणे संपादन करण्यात आलेली कोणतीही संपत्ती खुद्द स्वतः किंवा स्वतःच्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तिमार्फत धारण करणे कायदेशीर ठरणार नाही.

(२) कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१) च्या उपबंधाचे उल्लंघन करून अवैधपणे संपादन केलेली कोणतीही संपत्ती धारण करीत असेल त्या बाबतीत, अशी संपत्ती या अधिनियमाच्या उपबंधानुसार समपहृत होऊन केंद्र शासनाकडे जमा होण्यास पात्र असेल.

सक्षम प्राधिकरण.

**५.** (१) केंद्र शासन स्वतःस योग्य वाटतील तितक्या केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांना (शासनाचे संयुक्त सचिव याच्यापेक्षा खालचा दर्जा नसलेल्या) **शासकीय राजपत्रात** प्रकाशित केलेल्या आदेशाद्वारे या अधिनियमाखालील सक्षम प्राधिकरणांची कार्ये पार पाडण्याकरिता प्राधिकृत करू शकेल.

(२) सक्षम प्राधिकरणे, ज्यांच्याबद्दल केंद्र शासन आदेशाद्वारे निदेश देईल अशा व्यक्तिंच्या किंवा व्यक्तिवर्गाच्या संबंधात आपली कार्ये पार पाडतील.

६. (१) हा अधिनियम ज्या व्यक्तिला लागू होतो अशा कोणत्याही व्यक्तिने खुद्द स्वत: किंवा स्वत:च्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तिमार्फत धारण केलेल्या संपत्तीचे मूल्य, तिच्या उत्पन्नाचे, कमाईचे किंवा मत्तेचे ज्ञात उगममार्ग, आणि कलम १८ खालील कार्यवाहीमुळे किंवा अन्यथा स्वत:ला उपलब्ध झालेली अन्य कोणतीही माहिती किंवा सामग्री विचारात घेतल्यानंतर जर, अशी सर्व किंवा त्यापैकी कोणतीही संपत्ती अवैधपणे संपादित केली आहे असे सक्षम प्राधिकरणाला सकारण वाटले तर (तसे वाटण्याबद्दलची कारणे लेखी नमूद करावयाची), ते अशा व्यक्तिवर (यापुढे तिला 'बाधित व्यक्ती ' म्हणून संबोधण्यात आले आहे) नोटीस बजावून तीद्वारे, जी साधारणपणे तीस दिवसांपेक्षा कमी असणार नाही अशा व नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या मुदतीत, ज्यातून किंवा ज्यांच्या साहाय्याने तिने अशी संपत्ती संपादित केली आहे त्या उत्पन्नाचे, कमाईचे किंवा मत्तेचे उगममार्ग आणि ज्यावर ती विसंबून आहे तो साक्षीपुरावा व अन्य संबद्ध माहिती व तपशील कळविण्यास आणि अशी सर्व किंवा, प्रकरणपरत्वे, त्यापैकी कोणतीही संपत्ती अवैधपणे संपादित केली असल्याचे घोषित का करू नये व या अधिनियमाखाली ती समपहृत करून केंद्र शासनाकडे जमा का करू नये यासंबंधीचे कारण दाखवण्यास फर्मावू शकेल. समपहरणाची नोटीस.

(२) पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही व्यक्तिला देण्यात आलेल्या नोटिशीत एखादी संपत्ती अशा व्यक्तिच्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तिने धारण केली आहे असे विनिर्दिष्ट करण्यात आले असेल त्या बाबतीत, अशा अन्य व्यक्तिलाही नोटिशीची एक प्रत पाठवून ती बजावली जाईल.

७. (१) सक्षम प्राधिकरण, कलम ६ अन्वये देण्यात आलेल्या "कारण दाखवा" नोटिशीच्या उत्तरादाखल काही खुलासा देण्यात आला असेल तर, तो खुलासा, आणि त्याच्यापुढे उपलब्ध झालेली माहिती विचारात घेतल्यानंतर आणि बाधित व्यक्तिला (आणि नोटिशीत विनिर्दिष्ट केलेली कोणतीही संपत्ती जर बाधित व्यक्तिने अन्य कोणत्याही व्यक्तिमार्फत धारण केली असेल तर, अशा बाबतीत, त्या अन्य व्यक्तिलाही) आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, प्रस्तुत सर्व किंवा त्यांपैकी कोणतीही संपत्ती ही अवैधपणे संपादित केलेली संपत्ती आहे किंवा कसे याबाबतचा निष्कर्ष आदेशाद्वारे नमूद करील. विवक्षित प्रकरणी, संपत्तीचे समपहरण.

(२) "कारण दाखवा" नोटिशीमध्ये निर्दिष्ट केलेल्या संपत्तीपैकी काही संपत्ती अवैधपणे संपादित केलेली संपत्ती आहे अशी सक्षम प्राधिकरणाची खात्री पटली असेल, परंतु अशी संपत्ती नेमकी कोणती हे जर ओळखू शकत नसेल तर, अशा बाबतीत, कोणती संपत्ती ही अवैधपणे संपादित केलेली संपत्ती आहे ते आपल्या पराकाष्ठा निर्णयशक्तीनुसार विनिर्दिष्ट करून सक्षम प्राधिकरणाने तदनुसार पोट-कलम (१) अन्वये आपला निष्कर्ष नमूद करणे कायदेशीर होईल.

(३) सक्षम प्राधिकरण एखादी संपत्ती ही अवैधपणे संपादित केलेली संपत्ती आहे अशा आशयाचा या कलमान्वये निष्कर्ष नमूद करील त्याबाबतीत, ते अशी संपत्ती या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, सर्व भारांपासून मुक्त अशा अवस्थेत समपहृत होऊन केंद्र शासनाकडे जमा होईल असे घोषित करील.

(४) ज्याबाबतीत या अधिनियमान्वये एखाद्या कंपनीचे शेअर्स समपहृत होऊन केंद्र शासनाकडे जमा झाले असतील त्याबाबतीत, कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) किंवा कंपनीची संस्थापन नियमावली यामध्ये काहीही असले तरी, ती कंपनी केंद्र शासनाची अशा शेअर्सचा हस्तांतरिती म्हणून नोंदणी करील.

८. या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीमध्ये, कलम ६ अन्वये दिलेल्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेली कोणतीही संपत्ती ही अवैधपणे संपादित केलेली संपत्ती नाही हे शाबीत करण्याचा भार बाधित व्यक्तिवर राहील. शाबितीचा भार.

९. (१) एखादी संपत्ती समपहृत होऊन केंद्र शासनाकडे जमा झाली आहे असे कलम ७ खाली सक्षम प्राधिकरणाने घोषित केलेले असेल आणि ज्याद्वारे ही संपत्ती संपादन करण्यात आली होती ते उत्पन्न, ती कमाई किंवा मत्ता यांच्या निम्म्यापेक्षाही कमी एवढ्याच भागाचा उगममार्ग सक्षम प्राधिकरणाचे समाधान होईल अशा प्रकारे शाबीत करण्यात आलेला नसेल त्याबाबतीत सक्षम प्राधिकरण बाधित व्यक्तिला समपहरणाच्या ऐवजी, अशा भागाच्या मूल्याच्या एकपूर्णांक एक पंचमांशाइतका द्रव्यदंड भरण्याचा पर्याय निवडण्याचा अधिकार देणारा आदेश काढील. समपहरणाच्या ऐवजी द्रव्यदंड.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, एखादी संपत्ती ज्याच्यायोगे संपादित करण्यात आली आहे ते उत्पन्न, ती कमाई किंवा ती मत्ता यांच्या कोणत्याही भागाचे मूल्य पुढीलप्रमाणे असेल :—

(क) उत्पन्न किंवा कमाई यांच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत, उत्पन्नाच्या किंवा कमाईच्या अशा भागाची रक्कम ;

(ख्) मत्तेच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत, अशा मत्तेच्या संपादनाकरिता द्याव्या लागलेल्या प्रतिफलाच्या पूर्ण मूल्याचा प्रमाणशीर भाग.

(२) पोट-कलम (१) खाली द्रव्यदंड लादण्यासंबंधीचा आदेश देण्यापूर्वी बाधित व्यक्तिला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिली जाईल.

(३) बाधित व्यक्तिने पोट-कलम (१) खाली देय असलेला द्रव्यदंड त्या बाबतीत देण्यात येईल अशा मुदतीत भरला तर त्याबाबतीत, सक्षम प्राधिकरण आदेशाद्वारे कलम ७ खाली केलेली समपहरणाची घोषणा रद्द करू शकेल आणि त्यानंतर अशी संपत्ती मुक्तावस्थेत राहील.

विशिष्ट न्यास संपत्तीच्या संबंधातील कार्यपद्धती.

**१०.** कलम २, पोट-कलम (२), स्पष्टीकरण ३, खंड (सहा) यामध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही व्यक्तिच्या बाबतीत, न्यास म्हणून धारण केलेली एखादी संपत्ती ही अवैधपणे संपादित केलेली संपत्ती आहे असे सक्षम प्राधिकरणाला त्याच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या आणि सामग्रीच्या आधारे सकारण वाटत असेल (तसे वाटण्याबद्दलची कारणे लेखी नमूद करावयाची) तर, ते प्राधिकरण न्यासाचा निर्माता किंवा, प्रकरणपरत्वे, न्यासाने जिच्यातून किंवा जिच्या साहाय्याने अशी संपत्ती, संपादन केली होती त्या मत्तेचा अंशदाता आणि विश्वस्त यांच्यावर नोटीस बजावून, तीद्वारे, जी साधारणपणे तीस दिवसांपेक्षा कमी असणार नाही अशा, नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या मुदतीत, ज्यातून किंवा ज्याच्या साहाय्याने अशी संपत्ती संपादित करण्यात आली होती अशा पैशांचा किंवा अशा अन्य मत्तेचा उगममार्ग किंवा, प्रकरणपरत्वे, अशी संपत्ती संपादित करण्याकरिता न्यासात ज्याचे अंशदान करण्यात आले होते असा पैसा किंवा अशी अन्य मत्ता यांचा उगममार्ग कोणता यासंबंधी खुलासा करण्यास फर्मावू शकेल आणि त्यानंतर अशी नोटीस ही कलम ६ खाली बजावण्यात आलेली नोटीस असल्याचे मानण्यात येईल, आणि या अधिनियमाचे अन्य सर्व उपबंध तद्नुसार लागू होतील.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, "अवैधपणे संपादन केलेली संपत्ती" हा शब्दप्रयोग, न्यास म्हणून धारण केलेल्या कोणत्याही संपत्तीच्या संबंधात वापरला असता त्यामध्ये पुढील संपत्तीचा समावेश होता :—

(एक) जी कोणतीही संपत्ती, न्यासाचा निर्माता किंवा न्यासात अशा संपत्तीचे अंशदान करणारा अंशदाता याने धारण करण्याचे चालू ठेवले असते तर, अशा न्यासाच्या, निर्मात्याच्या किंवा अंशदात्याच्या संबंधात अवैधपणे संपादन केलेली संपत्ती ठरली असती, ती संपत्ती ;

(दोन) कोणत्याही व्यक्तिने केलेल्या कोणत्याही अंशदानातून न्यासाने संपादित केलेली जी कोणतीही संपत्ती जर अशा व्यक्तिने अशा अंशदानामधून संपादित केली असती तर ती अशा व्यक्तिच्या संबंधात अवैधपणे संपादन केलेली संपत्ती ठरली असती, अशी संपत्ती.

विवक्षित हस्तांतरणे रद्दबातल असणे.

**११.** कलम ६ अन्वये अथवा कलम १० अन्वये नोटीस काढण्यात आल्यानंतर, उक्त नोटिशीत निर्दिष्ट केलेली कोणतीही संपत्ती कोणत्याही पद्धतीने हस्तांतरित केली जाईल त्याबाबतीत, या अधिनियमानुसार चालवलेल्या कार्यवाहीच्या प्रयोजनार्थ, असे हस्तांतरण दुर्लक्षिले जाईल आणि जर अशी संपत्ती त्यानंतर कलम ७ अन्वये समपहृत होऊन केंद्र शासनाकडे जमा झाली तर, अशा संपत्तीचे हस्तांतरण रद्दबातल समजण्यात येईल.

अपील न्यायाधिकरण घटित करणे.

**१२.** (१) केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे समपहृत संपत्ती अपील न्यायाधिकरण या नावाने संबोधावयाचे असे एक अपील न्यायाधिकरण घटित करू शकेल आणि एक अध्यक्ष व केंद्र शासनाला योग्य वाटतील तितके अन्य सदस्य (शासनाचा संयुक्त सचिव याच्या दर्जापेक्षा खालचा दर्जा नसलेले असे ते केंद्र शासनाचे अधिकारी असतील) मिळून ते न्यायाधिकरण बनलेले असेल आणि कलम ७, कलम ९ चे पोट-कलम (१) किंवा कलम १० या अन्वये काढण्यात आलेल्या आदेशांच्या विरुद्ध केल्या जाणाऱ्या अपिलांच्या सुनावणीसाठी त्या शासनाकडून त्यांची नियुक्ती करण्यात येईल.

(२) अपील न्यायाधिकरणाचा अध्यक्ष म्हणजे जी व्यक्ती सर्वोच्च न्यायालयाचा किंवा, उच्च न्यायालयाचा न्यायाधीश आहे किंवा होती किंवा तसा न्यायाधीश होण्यास अर्ह आहे अशी व्यक्ती असेल.

(३) अध्यक्ष आणि अन्य सदस्य यांच्या सेवेच्या अटी आणि शर्ती विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(४) कलम ७, कलम ९ चे पोट-कलम (१) किंवा कलम १० यांअन्वये सक्षम प्राधिकरणाने दिलेल्या आदेशामुळे नाराज झालेली कोणतीही व्यक्ती, तो आदेश तिच्यावर बजावण्यात आल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत अपील न्यायाधिकरणाकडे अपील करू शकेल :

परंतु, अपीलकर्ता वेळेवर अपील दाखल करू शकला नाही याला पुरेसे कारण होते अशी अपील न्यायाधिकरणाची खात्री झाल्यास, अपील न्यायाधिकरणास असे कोणतेही अपील पूर्वोक्त दिनांकापासून उक्त पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीनंतर विचारार्थ स्वीकारता येईल, परंतु साठ दिवसानंतर मात्र नाही.

(५) पोटकलम (४) अन्वये एखादे अपील स्वीकारल्यानंतर अपील न्यायाधिकरण अपीलकर्त्यास त्याची इच्छा असल्यास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देऊन आणि स्वत:ला योग्य वाटेल अशी आणखी चौकशी करून नंतर, ज्या आदेशाविरुद्ध अपील करण्यात आले आहे तो आदेश कायम, विशोधित किंवा रद्द करू शकेल.

(६) तीन सदस्य मिळून बनलेली आणि अपील न्यायाधिकरणाच्या अध्यक्षाने घटित केलेली न्यायपीठे अपील न्यायाधिकरणाच्या शक्ती वापरू शकतील आणि त्या न्यायाधिकरणाची कार्ये पार पडू शकतील.

[१][ (६क्) पोटकलम (६) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमान्वये दाखल करण्यात आलेली अपिले शीघ्रतेने निकालात काढण्यासाठी दोन सदस्यांचे एक न्यायपीठ घटित करणे आवश्यक आहे असे अध्यक्षास वाटत असेल तर, त्यास तसे करता येईल आणि अशा रीतीने घटित केलेल न्यायपीठ अपील न्यायाधिकरणाच्या शक्ती वापरू शकेल आणि त्या न्यायाधिकरणाची कार्ये पार पाडू शकेल :

परंतु, अशा रीतीने घटित केलेल्या न्यायपीठाच्या सदस्यांमध्ये कोणत्याही मुद्याविषयी किंवा मुद्यांविषयी मतभेद झाल्यास, ते सदस्य ज्याबाबत त्यांच्यात मतभेद असेल तो मुद्दा किंवा ते मुद्दे नमूद करून ते त्या मुद्याच्या किंवा मुद्यांच्या सुनावणीसाठी एखाद्या तिसऱ्या सदस्याकडे (हा सदस्य अध्यक्ष विनिर्दिष्ट करील) निर्णयार्थ पाठवतील आणि त्या सदस्यांच्या अभिप्रायानुसार अशा मुद्याचा किंवा मुद्यांचा निर्णय देण्यात येईल. ]

(७) अपील न्यायाधिकरण आपली स्वत:ची कार्यपद्धती विनियमित करू शकेल.

[२][(८) अपील न्यायाधिकरणाकडे अर्ज करण्यात आल्यानंतर आणि विहित फी भरण्यात आल्यानंतर, न्यायाधिकरण कोणत्याही अपिलातील एखाद्या पक्षकारास किंवा अशा पक्षकाराने या संबंधात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, कार्यालयाच्या वेळेत कोणत्याही वेळी न्यायाधिकरणाचे कोणतेही संबंधित अभिलेख आणि नोंदवह्या यांची पाहणी करण्याची आणि त्यातील कोणत्याही भागाची प्रमाणित प्रत मिळवण्याची परवानगी देऊ शकेल. ]

**नोटीस किंवा आदेश त्यातील वर्णनात कोणतीही चूक असल्यामुळे विधिबाह्य न होणे.**

**१३.** या अधिनियमान्वये काढलेली किंवा बजावलेली कोणतीही नोटीस, केलेली कोणतीही घोषणा आणि दिलेला कोणताही आदेश यात नमूद केलेली संपत्ती किंवा व्यक्ती यांच्या वर्णनात काही चूक असली तरी, जर अशी व्यक्ती किंवा संपत्ती याप्रमाणे नमूद केलेल्या वर्णनावरून ओळखू येण्याजोगी असेल तर, अशा कोणत्याही चुकीमुळे ती नोटीस, ती घोषणा किंवा तो आदेश विधिबाह्य असल्याचे मानले जाणार नाही.

**अधिकारितेला आडकाठी.**

**१४.** या अधिनियमान्वये काढलेला कोणताही आदेश किंवा केलेली कोणतीही घोषणा, त्यात तसे उपबंधित केले असेल त्याखेरीज अन्यथा अपिलपात्र असणार नाही आणि ज्याबाबतीत निर्णय देण्याची शक्ती या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली अपील न्यायाधिकरणाला किंवा सक्षम प्राधिकरणाला प्रदान करण्यात आली आहे अशा कोणत्याही बाबीसंबंधी कोणत्याही दिवाणी न्यायालयाला अधिकारिता असणार नाही, आणि या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही शक्तीचा वापर करून करण्यात आलेल्या किंवा करावयाच्या कोणत्याही कारवाईच्या संबंधात कोणत्याही न्यायालयाकडून किंवा अन्य प्राधिकरणाकडून कोणताही आदेश दिला जाणार नाही.

**सक्षम प्राधिकरण आणि अपील न्यायाधिकरण यांना दिवाणी न्यायालयाच्या शक्ती असणे.**

**१५.** दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, (१९०८ चा ५) अन्वये एखाद्या दाव्याची संपरीक्षा करताना, पुढील बाबीसंबंधी दिवाणी न्यायालयाला असतात त्या सर्व शक्ती सक्षम प्राधिकरण आणि अपील न्यायाधिकरण यांना असतील, त्या बाबी अशा :—

(क्) कोणत्याही व्यक्तीला समन्स पाठविणे व तिला हजर राहावयास भाग पाडणे, आणि तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ख्) दस्तऐवज प्रकट करून दाखल करण्यास फर्माविणे ;

(ग्) प्रतिज्ञालेखावरून पुरावा स्वीकारणे ;

(घ्) कोणत्याही न्यायालयातून किंवा कार्यालयातून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची प्रत मागविणे ;

---

१. १९८० चा अधिनियम ५५, कलम २ (क्) द्वारे दाखल केले (१ जुलै, १९८१ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २ (ख्) द्वारे दाखल केले (१ जुलै, १९८१ रोजी व तेव्हापासून).

(ङ) साक्षीदार किंवा दस्तऐवज यांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे काढणे ;

(च) विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

सक्षम प्राधिकरणाला माहिती देणे.

**१६.** (१) अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, सक्षम प्राधिकरणाच्या मते या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी उपयुक्त किंवा त्यांच्याशी संबद्ध ठरतील अशा व्यक्ती, असे मुद्दे किंवा अशा बाबी यांच्या संबंधातील माहिती सादर करण्यास केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा प्राधिकरणाला फर्माविण्याची त्या सक्षम प्राधिकरणाला शक्ती असेल.

(२) आयकर विभाग, सीमाशुल्क विभाग किंवा केंद्रीय उत्पादन शुल्क विभाग यातील कोणताही अधिकारी किंवा विदेशी विनिमय चलन विनियमन अधिनियम, १९७३, (१९७३ चा ४६) या अन्वये नियुक्त करण्यात आलेला कोणताही अंमलबजावणी शाखेचा अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली अशी कोणतीही माहिती त्याच्या मते या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ सक्षम प्राधिकरणाला उपयुक्त ठरणार असेल तर, तो आपण होऊन अशी माहिती सक्षम प्राधिकरणाकडे सादर करू शकेल.

विवक्षित अधिकाऱ्यांनी सक्षम प्राधिकरणाला आणि अपील न्यायाधिकरणाला सहाय्य करणे.

**१७.** या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या प्रयोजनार्थ, सक्षम प्राधिकरण आणि अपील न्यायाधिकरण यांना सहाय्य करण्यासाठी पुढील अधिकाऱ्यांना याद्वारे शक्ती प्रदान करण्यात आल्या असून त्यांनी तसे सहाय्य करणे आवश्यक करण्यात आले आहे ; ते असे :—

(क) सीमाशुल्क विभागाचे अधिकारी ;

(ख) केंद्रीय उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी ;

(ग) आयकर विभागाचे अधिकारी ;

(घ) परकीय चलन विनियमन अधिनियम, १९७३ (१९७३ चा ४६) या अन्वये नियुक्त केलेले अंमलबजावणी शाखेचे अधिकारी ;

(ङ) पोलीस अधिकारी ;

(च) केंद्र शासनाने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे यासंबंधात विनिर्दिष्ट केलेले असे केंद्र किंवा राज्य शासनाचे अन्य अधिकारी.

विवक्षित अधिकाऱ्यांन्या विशिष्ट शक्तींचा वापर करण्यास फर्माविण्याची सक्षम प्राधिकरणाची शक्ती.

**१८.** (१) या अधिनियमान्वये करण्यात येणाऱ्या कोणत्याही कार्यवाहीच्या किंवा अशी कार्यवाही सुरू करण्याच्या प्रयोजनार्थ, कोणतीही व्यक्ती, ठिकाण, संपत्ती, मत्ता, दस्तऐवज, हिशेब पुस्तके किंवा अन्य कोणत्याही संबद्ध बाबी यांच्यासंबंधात एखादी चौकशी, अन्वेषण किंवा सर्वेक्षण करविण्याची सक्षम प्राधिकरणाला शक्ती असेल.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या प्रयोजनार्थ, अशी चौकशी, अन्वेषण किंवा सर्वेक्षण यांचे स्वरूप विचारात घेऊन, सक्षम प्राधिकरण, आयकर विभागाच्या एखाद्या अधिकाऱ्याला अशी चौकशी, अन्वेषण किंवा सर्वेक्षण करण्यास किंवा करविण्यास फर्मावू शकेल.

(३) पोट-कलम (२) अन्वये जी चौकशी, जे अन्वेषण किंवा सर्वेक्षण करणे आवश्यक आहे ती चौकशी, ते अन्वेषण किंवा सर्वेक्षण करणारा किंवा करविणारा आयकर विभागाचा कोणताही अधिकारी, अशी चौकशी, अन्वेषण किंवा सर्वेक्षण यांच्या प्रयोजनार्थ, आयकर अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४३) याखालील कोणत्याही प्रयोजनाकरिता त्याला वापरता येईल अशी कोणतीही शक्ती (अशा कोणत्याही शक्तीचा वापर करण्यास प्राधिकृत करण्याची शक्ती धरून) वापरू शकेल आणि तदनुसार उक्त अधिनियमांचे उपबंध, शक्य होईल तितपत, लागू होतील.

कब्जा घेण्याची शक्ती.

**१९.** (१) ज्याबाबतीत या अधिनियमान्वये एखादी संपत्ती समपहृत होऊन केंद्र शासनाकडे जमा झाल्याचे घोषित केले असेल, किंवा बाधित व्यक्तीने कलम ९ चे पोट-कलम (१) या अन्वये देय असलेली द्रव्यदंडाची रक्कम, त्या कलमाच्या पोट-कलम (३) अन्वये त्यासाठी देण्यात आलेल्या मुदतीत देण्यास कसूर केली असेल त्या बाबतीत, बाधित व्यक्तीला, तसेच जिच्या कब्जात ती संपत्ती असेल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीला आदेश देऊन, आदेश बजाविण्यात आल्यापासून तीस दिवसांच्या आत तिने ती संपत्ती सक्षम प्राधिकाऱ्याच्या किंवा त्याने यासंबंधात रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या स्वाधीन करावी किंवा तिचा कब्जा सुपूर्द करावा, असे सक्षम प्राधिकरण फर्मावू शकेल.

(२) जर एखाद्या व्यक्तीने पोट-कलम (१) अन्वये करण्यात आलेल्या आदेशाचे अनुपालन करण्यास नकार दिला किंवा त्याचे पालन करण्यात कसूर केली तर, सक्षम प्राधिकरण त्या संपत्तीचा कब्जा घेऊ शकेल आणि त्यासाठी आवश्यक असेल तितक्या बळाचा वापर करू शकेल.

(३) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, सक्षम प्राधिकरण, पोट-कलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही संपत्तीचा कब्जा घेण्याच्या कामी त्याला सहाय्य करण्यासाठी कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याची मदत मागवू शकेल आणि अशी मागणी पुरी करणे हे अशा पोलीस अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल.

**२०.** अभिलेखावरून उघड दिसून येणाऱ्या कोणत्याही चुका दुरुस्त करण्याच्या दृष्टीने, सक्षम प्राधिकरण किंवा, प्रकरणपरत्वे, अपील न्यायाधिकरण स्वत: केलेला कोणताही आदेश, तो केल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत विशोधित करू शकेल : चुकांची दुरुस्ती.

परंतु, अशा विशोधनामुळे एखाद्या व्यक्तीवर बाधक परिणाम होण्याची शक्यता असेल तर, अशा व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याचा वाजवी संधी दिल्याखेरीज असे कोणतेही विशोधन केले जाणार नाही.

**२१.** कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा प्राधिकरणाने अन्य कोणत्याही कायद्यान्वये काढलेले कोणतेही निष्कर्ष, या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या प्रयोजनार्थ निर्णायक असणार नाहीत. अन्य कायद्यान्वये काढलेले निष्कर्ष या अधिनियमाखालील कार्यवाहीच्या प्रयोजनार्थ निर्णायक नसणे.

**२२.** या अधिनियमान्वये काढलेली कोणतीही नोटीस किंवा केलेला कोणताही आदेश यांची बजावणी पुढील पद्धतीने केली जाईल :—

(क) ज्या व्यक्तीला अनुलक्षून ही नोटीस किंवा हा आदेश काढण्यात आलेला असेल त्या व्यक्तीला किंवा तिच्या अभिकर्त्याला ही नोटीस किंवा आदेश देऊ करून किंवा नोंदणी डाकेने पाठवून ;

(ख) खंड (क) मध्ये दिलेल्या पद्धतीने जर ही नोटीस किंवा हा आदेश बजावता येत नसेल तर, ज्या संपत्तीच्या संबंधात ही नोटीस काढण्यात आली आहे किंवा हा आदेश करण्यात आलेला आहे त्या संपत्तीच्या ठिकाणी एखाद्या ठळक जागी, अथवा ती नोटीस किंवा आदेश ज्या व्यक्तीला अनुलक्षून आहे ती व्यक्ती निकटपूर्वी जेथे राहत असल्याचे माहीत आहे किंवा जेथे ती कोणताही धंदा चालवीत होती किंवा जेथे ती व्यक्तीश: कमाईसाठी कामधंदा करीत होती त्या वास्तूमध्ये एखाद्या ठळक जागी चिकटवून.

**२३.** हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम यांना अनुसरून सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल केंद्र शासन अथवा केंद्र शासनाचा किंवा राज्य शासनाचा कोणताही अधिकारी यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

**२४.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये या अधिनियमाच्या उपबंधाशी विसंगत असे काहीही असले तरी, या अधिनियमाचे उपबंध परिणामकारक होतील. या अधिनियमाला अधिभावी परिणाम असणे.

**२५.** संपूर्णपणे सार्वजनिक, धार्मिक किंवा धर्मदाय प्रयोजनार्थ निर्माण केलेल्या किंवा स्थापन केलेल्या एखाद्या न्यासाने किंवा संस्थेने धारण केलेली कोणतीही संपत्ती जर,— या अधिनियमाचे उपबंध न्यास म्हणून धारण केलेल्या विवक्षित संपत्तीला लागू नसणे.

(एक) अशा न्यासाने किंवा संस्थेने या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वीच्या दिनांकापासून अशा प्रकारे धारण केलेली असेल तर ; किंवा

(दोन) अशा न्यासाने किंवा संस्थेने या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी धारण केलेल्या संपत्तीची सर्वस्वी संबंधनीय असेल तर,

—अशा कोणत्याही पूर्वोक्त संपत्तीच्या संबंधात या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

**२६.** (१) या अधिनियमाच्या उपबंधाची अंमलबजावणी करण्याकरिता केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करू शकेल. नियम करण्याची शक्ती.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तींच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांद्वारे पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येतील, त्या बाबी अशा :—

(क) कलम १२ चे पोट-कलम (३) याखाली अपील न्यायाधिकरणाचा अध्यक्ष आणि अन्य सदस्य यांच्या सेवेच्या अटी व शर्ती ;

[१][(कक्) कलम १२, पोट-कलम (८) अन्वये अपील न्यायाधिकरणाच्या अभिलेखांची व नोंदवह्यांची पाहणी करण्यासाठी व त्यांच्या कोणत्याही भागाची प्रमाणित प्रत मिळवण्यासाठी भरावयाची फी ;]

(ख) कलम १५, खंड (च) खाली सक्षम प्राधिकरण आणि अपील न्यायाधिकरण यांना दिवाणी न्यायालयाच्या ज्या शक्ती वापरता येण्यासारख्या असतील त्या शक्ती ;

(ग) विहित करावयाची किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या अधिनियामाखाली करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते सत्रासीन असताना, एका सत्राने अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले, अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे मुळीच परिणामक होणार नाही, तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिबाह्यतेस बाध येणार नाही.

निरसन आणि व्यावृत्ती.

**२७.** (१) याद्वारे तस्कर आणि विदेशी विनिमय चलन कूटव्यवहारी (संपत्तीचे समपहरण) अध्यादेश, १९७५ (१९७५ चा २०) निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झालेले असले तरी, याप्रमाणे निरसित केलेल्या अध्यादेशाखाली केलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कारवाई ही या अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

---

१. १९८० चा अधिनियम ५५, कलम ३ द्वारे घातले (१ जुलै, १९८१ रोजी व तेव्हापासून).

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई